लोकमत 5-9-2023 Pg No 3 (c)

# सव्वाचारशे सहकारी संस्थांना मिळणार ७२ कोटींचे अनुदान व कर्ज

## दिलीप वळसे-पाटील यांनी दिले महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाला निर्देश; ४२८ संस्थांच्या प्रस्तावांना महामंडळाची मंजुरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ राज्यातील सुमारे सव्वाचारशे सहकारी संस्थांना त्यांच्या व्यवसाय व प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी ७२ कोटी रुपयांचे अनुदान, तसेच कर्जवाटप करणार आहे. तत्कालीन युती सरकारच्या काळात २०१८मध्ये स्थापन झालेल्या या महामंडळामार्फत ८० कोटी रुपयांचे अनुदान वाटप करण्यात येणार होते. मात्र, सरकार बदलल्यानंतर हे अनुदान मिळाले नव्हते. आता सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सोमवारी (दि. ४) हे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.

युती सरकारमध्ये नोव्हेंबर २०१८ मध्ये झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सहकारी संस्थांच्या व्यवसाय व प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी 'अटल अर्थसहाय्य योजना' राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी सरकारने ८० कोटी रुपयांचे अनुदान मंजूर केले होते. त्यासाठी राज्यातील १ हजार ८७१ सहकारी संस्थांचे सर्वेक्षण करून त्यांच्याकडून प्रस्ताव मागण्यात आले होते. महाविकास आघाडी सरकारच्या काळात हे अनुदान मिळाले नाही. या सहकारी संस्थांचे अनुदान रखडले होते. शिंदे-फडणवीस यांचे सरकार पुन्हा सत्तेत आल्यानंतर या अनुदानासंदर्भात मेमध्ये महामंडळाला पुन्हा सर्वेक्षणाचे आदेश देण्यात आले. राज्यातील ४२८ संस्थांच्या प्रस्तावांना महामंडळाने मंजुरीदेखील दिली. राज्य सरकारने हे अनुदान दिल्यावर त्याला योजनेच्या राज्यस्तरीय समितीची मान्यता आवश्यक होती.

समितीची सोमवारी पुण्यात बैठक झाली. त्यात सहकार आयुक्त अनिल कवडे, कृषी आयुक्त सुनील चव्हाण, पणन संचालक डॉ. केदारी जाधव, कार्यकारी संचालक संजय कदम, कृषी विभागाच्या आत्माचे संचालक दशरथ तांबाळे व महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद आकरे उपस्थित होते.

बैठकीत या ७२ कोटी रुपयांच्या अनुदान व कर्जवाटपाला मान्यता देऊन संस्थांकडील प्रस्ताव पुन्हा तपासण्याचे आदेश देण्यात आले. प्रस्ताव पूर्ण असल्यास त्यांना हे अनुदान तातडीने देण्यात येणार आहे. अपूर्ण प्रस्तावांबाबत लेखा परीक्षण अहवाल द्यावे लागणार असल्याचे आकरे यांनी सांगितले. संस्थांना साडेबारा टक्के स्वनिधी म्हणून उभा करावा लागतो. तर महामंडळातर्फे साडेबारा टक्क्यांचे कर्ज दिले जाते. उर्वरित ७५ टक्के रक्कम अनुदान स्वरूपात दिली जाते.